**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २४४** **दिनांक :- ०६/०९/२०२१**

# मनुष्य मिसिंग प्रमाणे दाखल प्रकरणाचे तपासात खुनाचा गुन्हा उघडकीस.

दिनांक २८/०८/२०२१ रोजी इसम नामे भोलेनाथ रमाशंकर गोस्वामी वय ३६ वर्ष राहणार मु. पोस्ट सर्वतखानी, राज्य उत्तरप्रदेश हा हरवल्या बाबत त्याचे नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरुन तुळींज पोलीस ठाणे येथे मनुष्य मिसिंग क्रमांक ३०२/२०२१ प्रमाणे नोंद घेण्यात आली होती.

सदर इसमाचा शोध घेत असतांना व साक्षिदारांना विचारपूस करित असतांना तुळींज गुन्हेप्रकटीकरण पथकास मिळालेल्या विश्वसनिय बातमिनुसार संशईत इसम नामे मुकेश राजनारायण गुप्ता वय ३२ वर्ष राहणार महात्मा फुले चाळ, आंबेडकर नगर, ठाणे यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे सखोल विचारपूस केली असता समजुन आले की, मुकेश गुप्ता यास नमूद इसमाकडून पैसे घेणे बाकी होते व तो ते पैसे देत नसल्याने त्यास प्रथम दारु पाजून व नंतर त्याचा गळा आवळून तो मयत झाल्याची खात्री झाल्यानंतर भोलेनाथ गोस्वामी यास वालीव पोलीस ठाणे हद्दीत बापाने पोलीस चौकी पुढे रस्त्यालगत असलेल्या झाडीत फेकून निघून गेला होता. मुकेश गुप्ता याने सांगीतलेल्या हकिगतीप्रमाणे तुळींज पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने व आरोपीने दाखवलेल्या ठिकाणी जावून मृतदेह ताब्यात घेतला असता नातेवाईकांनी त्यास ओळखलेले आहे. सदर बाबत नमूद आरोपीविरुद्ध तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क्रमांक ००/२०२१ कलम ३०२ भादंवि प्रमाणे नोंद करून पुढील तपास वालीव पोलीस ठाण्यात वर्ग केला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. संदेश पालांडे, सपोनि. एम.डी.म्हात्रे, पोउपनी. ज्ञानेश्वर कोकाटे, सहा.पोउपनी. शिवानंद सुतनासे, पोहवा.अनिल शिंदे, पो.ना. आनंद मोरे, पोलीस नाईक उमेश वरठा, पोना शेखर पवार, पो.अं.७१५/अश्पाक जमादार, पो.अं/७५छपरीबन, पोअं/७५२ एस डी गडाख, पोशि ५६ विनायक राऊत यांनी केलेली आहे.

----ooo----